महाराष्ट्र शासन
प्राथमिक शिक्षण संचालनालय
डॉ.ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत,पुणे-४११००१.
दुरध्वनी : (०२०) २६०५४३१८
फॅक्स (०२०) २६१२८१५७/२६१२५८७४
दुरध्वनी : (०२०) २६१२५६९२
ई-मेल depmah2@gmail.com

जा.क्र./प्राशिसं/आरटीई-५२०/२०२०/271

दिनांक : १६/०१/२०२०

18 JAN 2020

प्रति,

१) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सर्व.
२) गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, सर्व.

**विषय :- सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाच्या आर.टी.ई. २५ टक्के प्रवेश प्रक्रियेबाबत.**

**संदर्भ :- १.** शासनाचे पत्र क्र.आरटीई-२०१९/प्र.क्र.२२०/एस.डी.१, दि. ०३/०१/२०२०.
**२.** शासनाचे पत्र क्र.आरटीई-२०१८/प्र.क्र.३१०/एस.डी.१, दि.०५/०२/२०१९

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२(१)(सी) नुसार खाजगी विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश स्तरावर २५ टक्के जागा वंचित व दुर्बल घटकातील मुला/मुलींसाठी राखीव ठेवण्याची तरतूद आहे.

दरवर्षी प्रमाणे सन २०२०-२१ या वर्षाची आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन राबविण्यात येत असून शासनाच्या संदर्भीय पत्रान्वये आपणांस प्रवेश प्रक्रियेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत त्या खालील प्रमाणे :-

१) सन २०१९-२० या वर्षी नोंदणी झालेल्या आर.टी.ई. २५ टक्के पात्र शाळांचे आपोआप Auto Registration करण्यात यावे. तथापि, या सर्व शाळांचे Verification BEO स्तरावरून करण्यात यावे. तसेच स्थलांतरीत शाळा, नव्याने अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त झालेल्या शाळा, अल्पसंख्यांक शाळा विचारात घेवून आवश्यक कार्यवाही करावी.

२) सर्व प्रथम आरटीई प्रवेश पात्र शाळांनी इयत्ता पहिलीचा डेटा सरल पोर्टलवर अपडेट करावा आणि मगच सन २०२०-२१ करीता रजिस्ट्रेशनची प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण करावी. अन्यथा आरटीई पोर्टलवर रजिस्ट्रेशन / व्हेरिफिकेशन करताना आरटीई २५ टक्के Vacancy अपडेट करता येणार नाही. सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ चे अवलोकन व्हावे. .

३) सन २०२०-२१ या वर्षाकरिता प्रवेश देण्यासाठी नव्याने समावेश करावयाच्या शाळांची नोंदणी पोर्टलवर करून घेण्यात यावी.

४) गट शिक्षण अधिकारी स्तरावर प्रवेश प्रक्रियेची कागदपत्रे तपासणीकरीता पडताळणी समित्या गठीत कराव्यात. तसेच महानगरपालिका स्तरावर देखील अशाच प्रकारच्या समित्या निर्माण कराव्यात. समितीमध्ये आवश्यक बदल करण्याची मुभा संबंधित अधिकाऱ्यांना राहील. पडताळणी समितीने खालील बाबींची तपासणी करावी.



Scanned by CamScanner

१. निवासी पुरावा - निवासी पुराव्याकरिता रेशनिंग कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, वीज/टेलिफोन देयक, प्रॉपर्टी टॅक्स देयक/घरपट्टी, गॅस बूक, बँक पासबूक, आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट इ. यापैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरावा. तसेच शासनाने यापूर्वी अधिसूचना अथवा शासन निर्णयाद्वारे जाहीर केलेले पुरावे ग्राह्य धरण्यात यावे.

२. जन्मतारखेचा पुरावा.

३. जात प्रमाणपत्र पुरावा.

४. उत्पन्नाचा पुरावा - सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये आरटीई अंतर्गत प्रवेश घेतांना विद्यार्थ्यांच्या पालकांचा सन २०१८-१९ किंवा २०१९-२० या वर्षाचा उत्पन्नाचा दाखला ग्राह्य धरावा. उत्पन्नाच्या दाखल्याकरीता salary slip, तहसिलदारांचा दाखला, कंपनीचा किंवा Employer चा दाखला गृहीत धरावा.

५. दिव्यांग मुलांसाठी वैद्यकीय प्रमाणपत्राचा पुरावा - जिल्हा शल्य चिकित्सक/वैद्यकीय अधिक्षक, अधिसुचित जिल्हा शासकीय रूग्णालय यांचे ४० टक्के पेक्षा जास्त दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र.

६. एस.ई.बी.सी. प्रवर्गाचा समावेश वंचित गटात करावा.

७. पालकांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरताना single Parent (विधवा, घटस्फोटित, आई अथवा वडील या पैकी कोणताही एक) पर्याय निवडला असेल तर संबंधित व्यक्तीचे प्रवेशासाठी लागणारे आवश्यक कागदपत्र ग्राह्य धरण्यात यावेत.

५) शाळा स्तरावर अलॉटमेंट नंतर पालक थेट शाळेत गेल्यास अडचणी येतात. त्यामुळे कागदपत्रे तपासणी याकरिता गट शिक्षण अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पडताळणी समिती गठीत करण्यात यावी. पडताळणी समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | समितीची रचना | संख्या | समितीतील स्थान |
|---|---|---|---|
| १ | गट शिक्षण अधिकारी | १ | अध्यक्ष |
| २ | केंद्र प्रमुख | २ | सदस्य |
| ३ | मुख्याध्यापक शासकीय शाळा | २ | सदस्य |
| ४ | मुख्याध्यापक अनुदानित शाळा | २ | सदस्य |
| ५ | मुख्याध्यापक विनाअनुदानित शाळा | २ | सदस्य |
| ६ | शिक्षण संस्थांचे प्रतिनिधी | २ | सदस्य |
| ७ | पालक संस्थांचे प्रतिनिधी | २ | सदस्य |
| ८ | शिक्षकांचे प्रतिनिधी | २ | सदस्य |
| ९ | पालक शिक्षक संघाचे प्रतिनिधी | २ | सदस्य |
| १० | स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी | २ | सदस्य |
| ११ | विस्तार शिक्षण अधिकारी | १ | सदस्य सचिव |



Scanned by CamScanner

६) पडताळणी समितीने सविस्तर माहिती सर्वांना दिसण्यासाठी पोर्टलवर भरावी.

७) पडताळणी समितीने मागील वर्षी प्रवेशित विद्यार्थ्यांची आकडेवारी विचारात घेवून पडताळणी विषयक कामकाज वेळेत होईल या दृष्टीने नियोजन करावे. पडताळणी समितीने रहिवासी पत्ता व वय याची पडताळणी सर्व पात्र विद्यार्थ्यांची करावी. सामाजिक वंचित संवर्गातील विद्यार्थ्यांकरीता जात प्रमाणपत्राची तर आर्थिक दुर्बल संवर्गातील विद्यार्थ्यांकरीता उत्पन्न प्रमाणपत्राची पडताळणी करावी. या दृष्टीने आवश्यक काऊंटर गट शिक्षण अधिकारी स्तरावर करण्यात यावेत.

८) समितीने संबंधित विद्यार्थ्यांची कागदपत्रे तपासणी करून प्रमाणित केल्यांनतर सदर विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची सुविधा आर.टी.ई. पोर्टलवर करण्यात येत आहे. पडताळणी समितीने तपासणी केलेले पात्र विद्यार्थी गट शिक्षण अधिकारी यांचे स्वाक्षरीत पत्र घेवून शाळेत जातील. शाळा स्तरावर कोणत्याही कागदपत्रांची तपासणी करण्यात येणार नाही. जे विद्यार्थी कागदपत्रे तपासणीमध्ये अपात्र होतील त्यांची निवड रद्द करण्यात यावी व अशा रद्द झालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाधिकारी यांचेकडे तक्रारीची दाद मागता येईल. शासन निर्णय दिनांक २१.०४.२०१४ नुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी जिल्हा, तालुका व न.पा./म.न.पा. स्तरावर तक्रार निवारण केंद्र व मदत केंद्राची स्थापना करावी.

९) गट शिक्षण अधिकारी यांनी बंद झालेल्या शाळा, नविन अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त केलेल्या शाळा, स्थलांतरित झालेल्या शाळा या शाळांची माहिती पोर्टलवर भरल्याची खात्री करुन पडताळणी करावी. कोणतीही पात्र शाळा राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०)सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता आरटीई अंतर्गत २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेसाठी ३ टप्प्याऐवजी एकाच टप्प्यात लॉटरी काढली जाईल. तसेच शाळेत आरटीई अंतर्गत उपलब्ध जागांएवढी एक प्रतिक्षा यादी (वेटींग लिस्ट) तयार केली जाईल. लॉटरी लागलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी उपयुक्त कालावधी देण्यात येईल. या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन शाळेत अजूनही जागा रिक्त राहिल्या असतील तर पहिली प्रतिक्षा यादी (वेटींग लिस्ट) मधील अनुक्रमे विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याबाबतचा मेसेज एनआयसी द्वारा पाठविला जाईल. मगच प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांनी अलॉटमेंट लेटर काढून विहित मुदतीत प्रवेश घ्यावा. या कालावधी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन शाळेत जागा रिक्त राहिल्या असतील तर दुसरी प्रतिक्षा यादी (वेटींग लिस्ट) मधील अनुक्रमे विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याबाबतचा मेसेज एनआयसी द्वारा पाठविला जाईल. मगच दुसऱ्या प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांनी अलॉटमेंट लेटर काढून विहित मुदतीत प्रवेश घ्यावा. अशा पद्धतीने आरटीई प्रवेश पात्र शाळांची प्रवेश क्षमता पूर्ण होईपर्यंत तिसरी आणि चौथी प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना एनआयसी कडुन मेसेज पाठविले जातील.



Scanned by CamScanner

११) विहित मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत बालकाला प्रवेश दिला जाणार नाही.

१२) संदर्भ क्र. २ चे शासनाचे पत्र दिनांक ०५/०२/२०१९ मध्ये दिलेल्या इतर सूचनांनुसार सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरिता आरटीई अंतर्गत २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रिया राबवावी.

१३) सदरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करून त्याची अंमलबजावणी करावी.

सोबत :- दिनांक ०५/०२/२०१९ चे शासन पत्र व परिशिष्ट अ.

18.01.2020

**(द.गो.जगताप)**
शिक्षण संचालक,
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
म.रा. पुणे-१.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :**

१. मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे - १.



Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन

ई-मेलद्वारे

क्रमांकः- आरटीई-२०१८/प्र.क्र.३१०/एस.डी-१,
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांकः- ०५ फेब्रुवारी, २०१९

प्रति,

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) श्रीमती नंदीनी क्षीरसागर, तांत्रिक संचालक, एन.आय.सी., पुणे

विषयः- सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाच्या आर.टी.ई. २५ टक्के प्रवेश प्रक्रियेबाबत.

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाच्या आर.टी.ई. २५ टक्के प्रवेश प्रक्रियेसंदर्भात आपणांस खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) सन २०१८-१९ या वर्षी नोंदणी झालेल्या आर.टी.ई.२५ टक्के पात्र शाळांचे आपोआप Auto Registration करण्यात यावे. तथापि, या सर्व शाळांचे verification BEO स्तरावरुन करण्यात यावे. स्थलांतरीत शाळा, नव्याने अल्पसंख्याक दर्जा प्राप्त झालेल्या शाळा विचारात घेऊन आवश्यक कार्यवाही करावी.

२) सन २०१९-२० या वर्षाकरिता प्रवेश देण्यासाठी नव्याने नोंदणी करावयाच्या शाळांची नोंदणी करुन घेण्यात यावी.

३) मागील वर्षी नोंदणी झालेल्या आर.टी.ई.२५ टक्के पात्र शाळांची मागील वर्षाची "सरल" मधील "सर्वसाधारण" (७५%) प्रवर्गातील प्रवेशाची माहिती घेण्यात यावी व त्या प्रवेशाच्या जास्तीत जास्त १/३ जागा आर.टी.ई.२५ टक्के प्रवेश प्रक्रिया २०१९-२० करिता निश्चित कराव्यात.

४) शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांनी आर.टी.ई.२५ टक्के प्रवेश प्रक्रियेची अंमलबजावणी करण्यासाठी गुगल एपीआय सर्व्हिस घेण्याकरिता एन.आय.सी.ला क्रेडिट कार्ड उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी. या बाबीवर होणारा खर्च ई-गव्हर्नन्स या लेखाशिर्षाखाली उपलब्ध तरतूदीतून भागवावा.

५) शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी प्रवेश प्रक्रियेसंदर्भात त्यांचे स्तरावरुन एन.आय.सी. तसेच सर्व संबंधित गट शिक्षण अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना खालीलप्रमाणे सूचना द्याव्यात.

अ) एन.आय.सी.करिता सूचना

१) शाळा पालकांना दिसताना एरियल डिस्टेन्ससंदर्भात ३ कि.मी. पर्यंत प्रतिबंधित कराव्यात.

Scanned by CamScanner

२) पालकांना त्यांच्या राहत्या ठिकाणापासून ते ३ कि.मी. पर्यंतच्या अंतरात असलेल्या अनुदानित आणि शासकीय शाळांची माहिती आर.टी.ई. पोर्टलवर उपलब्ध असेल अशी व्यवस्था करावी.

३) पालकांचे निवासस्थान व शाळा यातील अंतर हे प्रत्यक्ष असावे किंवा गुगल मॅपवर आधारित असावे.

४) लॉटरी राज्य स्तरावर काढण्यात यावी.

५) विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबतचे "प्रवेश टॅब", "रिजेक्टेड टॅब" व "नॉट ॲप्रोच टॅब", हे टॅब गट शिक्षणाधिकारी स्तरावरील पडताळणी समितीकडे ठेवण्याची व्यवस्था करावी.

६) प्रवेश झाल्यानंतर शाळा स्तरावर विद्यार्थी "नॉट ॲप्रोच" हा टॅब ठेवावा.

७) लॉटरी लागल्यानंतर आरटीई पोर्टलवर विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या पत्राचा एक सर्वसमान मसुदा असावा. ज्यामध्ये पडताळणी समितीला तपासणी करता येईल अशी सुविधा असावी व सदर पत्रावरच पडताळणी समितीची स्वाक्षरी राहिल अशी व्यवस्था करावी.

८) पालकांना आर.टी.ई. पोर्टलवर अर्ज भरत असताना कोणत्या शाळेमध्ये किती पालकांनी अर्ज केले आहेत याची माहिती दिसेल अशी व्यवस्था करावी.

९) पालकांना आरटीई पोर्टलवर शाळानिहाय किती जागा शिल्लक आहेत याची अद्ययावत माहिती वेळोवेळी उपलब्ध होईल अशी व्यवस्था करावी.

१०) शासन निर्णय दि.१६ ऑक्टोबर, २०१८ नुसार दिव्यांगांचे "इतर आजारांचा" समावेश आरटीई पोर्टलवर करावा.

११) एस.ई.बी.सी. प्रवर्गाचा समावेश वंचित गटात करावा.

१२) दि.११ ऑक्टोबर, २०११ च्या अधिसूचनेतील तरतूदीनुसार मतिमंद (Mentally Retarded) बालकांच्या बाबतीत दि.२१ जानेवारी, २०१५ व दि.२५ जानेवारी, २०१७ मधील तरतूदी लागू न करता त्यांना चार वर्षांची सवलत देण्यात यावी. म्हणजेच पूर्व प्राथमिकसाठी वय वर्षे ७ व इयत्ता पहिलीसाठी वय वर्षे १० इतकी कमाल मर्यादा ठेवण्यात यावी.

१३) शाळांची माहिती उदा. शाळेतील एकूण प्रवेशित विद्यार्थी, आरटीई अंतर्गत प्रवेशित विद्यार्थी, शाळेची फी, शाळेस शासनाकडून अदा करण्यात आलेली प्रति विद्यार्थी फी इत्यादी माहिती लोकांच्या माहितीसाठी पोर्टलवर उपलब्ध करुन द्यावी.

१४) पोर्टलवर पडताळणी समितीची सविस्तर माहिती पालकांना दिसेल अशी व्यवस्था करावी.

१५) प्रवेश अर्ज कसा भरावा याचे व्हिडिओ, पी.पी.टी., मार्गदर्शक सूचना पोर्टलवर द्याव्यात.

Scanned by CamScanner

## ब) सर्व संबंधित गट शिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सूचना



१) बालमोहन विद्यामंदीर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर (रिट पिटीशन ६२५/२०१८) या न्यायालयीन प्रकरणामध्ये शासनाने शपथपत्र दाखल केल्याप्रमाणे गट शिक्षणाधिकारी स्तरावर प्रवेश प्रक्रियेची कागदपत्रे तपासणीकरीता पडताळणी समित्या गठीत कराव्यात. तसेच महानगरपालिका स्तरावर देखील अशाच प्रकारच्या समित्या निर्माण कराव्यात. समितीमध्ये आवश्यक बदल करण्याची मुभा संबंधित अधिकाऱ्यांना राहिल. पडताळणी समितीने खालील बाबींची तपासणी करावी.

१) निवासी पुरावा- निवासी पुराव्याकरिता रेशनिंग कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, वीज देयक, प्रॉपर्टी टॅक्स देयक, गॅस बूक, बँक पासबूक, आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट इ.यापैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरावा. याबाबत पोर्टलवर आवश्यक कार्यवाही करावी

२) जन्मतारखेचा पुरावा

३) जात प्रमाणपत्र पुरावा

४) उत्पन्नाचा पुरावा - सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये आर.टी.ई. अंतर्गत प्रवेश घेताना विद्यार्थ्यांच्या पालकांचा सन २०१७-१८ किंवा सन २०१८-१९ या वर्षाचा उत्पन्नाचा दाखला ग्राहय धरावा. उत्पन्नाच्या दाखल्याकरीता Salary slip,तहसिलदारांचा दाखला, कंपनीचा किंवा employer चा दाखला गृहीत धरावा.

५) दिव्यांग मुलांसाठी वैद्यकीय प्रमाणपत्राचा पुरावा

२) शाळा स्तरावर ॲलॉटमेंट नंतर पालक थेट शाळेत गेल्यास अडचणी येतात. त्यामुळे कागदपत्रे तपासणी याकरिता BEO यांच्या अध्यक्षतेखाली पडताळणी समिती गठीत करण्यात यावी. पडताळणी समितीची रचना खालीलप्रमाणे राहिल.

| अ.क्र. | समितीची रचना | संख्या | समितीतील स्थान |
|---|---|---|---|
| १ | गट शिक्षणाधिकारी | १ | अध्यक्ष |
| २ | केंद्र प्रमुख | २ | सदस्य |
| ३ | मुख्याध्यापक शासकीय शाळा | २ | सदस्य |
| ४ | मुख्याध्यापक अनुदानित शाळ | २ | सदस्य |
| ५ | मुख्याध्यापक विना अनुदानित शाळा | २ | सदस्य |
| ६ | शिक्षण संस्थांचे प्रतिनिधी | २ | सदस्य |
| ७ | पालक संस्थांचे प्रतिनिधी | २ | सदस्य |
| ८ | शिक्षकांचे प्रतिनिधी | २ | सदस्य |
| ९ | पालक शिक्षक संघाचे प्रतिनिधी | २ | सदस्य |
| १० | स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी | २ | सदस्य |
| ११ | विस्तार शिक्षण अधिकारी | १ | सदस्य सचिव |

१) पडताळणी समितीने मागील वर्षी प्रवेशित विद्यार्थ्यांची आकडेवारी विचारात घेऊन पडताळणी विषयक कामकाज वेळेत पार होईल या दृष्टीने नियोजन करावे. पडताळणी समितीने

Scanned by CamScanner

रहिवासी पत्ता, वय याची पडताळणी सर्व पात्र विद्यार्थ्यांकरिता करावी. सामाजिक वंचित संवर्गातील विद्यार्थ्यांकरिता जात प्रमाणपत्राची तर आर्थिक वंचित संवर्गातील विद्यार्थ्यांकरिता उत्पन्न प्रमाणपत्राची पडताळणी करावी. या दृष्टीने आवश्यक काऊंटर BEO स्तरावर करण्यात यावेत.

२) समितीने संबंधित विद्यार्थ्यांची कागदपत्रे तपासणी करुन प्रमाणित केल्यानंतर सदर विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची सुविधा आर.टी.ई. पोर्टलवर असावी. पडताळणी समितीने तपासणी केलेले पात्र विद्यार्थी गट शिक्षणाधिकारी स्वाक्षरीत पत्र घेऊन शाळेत जातील. शाळा स्तरावर कोणत्याही कागदपत्रांची तपासणी करण्यात येणार नाही. ज्या विद्यार्थ्यांचे कागदपत्रे तपासणीमध्ये अपात्र होतील त्यांची निवड रद्द करण्यात यावी व अशा रद्द झालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाधिकारी यांचेकडे तक्रारीची दाद मागता येईल.

३) पडताळणी समितीची सविस्तर माहिती एन.आय.सी. ला द्यावी.

४) गट शिक्षणाधिकारी यांनी बंद झालेल्या शाळा, नवीन अल्पसंख्याक दर्जा प्राप्त केलेल्या शाळा, स्थलांतरित झालेल्या शाळा या शाळांची माहिती एन.आय.सी. ला द्यावी.

५) शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी सदर प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक तयार करावे व मे, २०१९ अखेर पर्यंत पूर्ण करुन संपविण्यात यावी.

(डॉ.सुवर्णा खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

Scanned by CamScanner

## परिशिष्ट अ

## आर.टी.ई. २५% ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया सन २०२०-२१

# संभाव्य वेळापत्रक

| अ.क्र. | बाब | कालावधी | | कामाचे दिवस |
|---|---|---|---|---|
| १ | आर.टी.ई. प्रवेशपात्र सन २०१९-२० च्या **Auto Forward** केलेल्या शाळांचे आणि नविन शाळांची नोंदणी केलेल्या शाळांचे **BEO** यांनी **Verification.** | २१/०१/२०२० | ०६/०२/२०२० | १५ |
| २ | पालकांनी ऑनलाईन अर्ज भरणे | ११/०२/२०२० | २९/०२/२०२० | १५ |
| ३ | सोडत (Lottery) काढणे | ११/०३/२०२० | १२/०३/२०२० | २ |
| ४ | लॉटरीद्वारा प्रवेश मिळालेल्या पालकांनी विहीत मुदतीत **BEO** कडे जावून कागदपत्रांची पडताळणी करणे आणि शाळेत जावून प्रवेश निश्चित करणे. | १६/०३/२०२० | ०३/०४/२०२० | १५ |
| ५ | प्रतिक्षा यादी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेणे. टप्पा - १ | १३/०४/२०२० | १८/०४/२०२० | ५ |
| ६ | प्रतिक्षा यादी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेणे. टप्पा - २ | २४/०४/२०२० | २९/०४/२०२० | ५ |
| ७ | प्रतिक्षा यादी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेणे. टप्पा - ३ | ०६/०५/२०२० | १२/०५/२०२० | ५ |
| ८ | प्रतिक्षा यादी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेणे. टप्पा - ३ | १८/०५/२०२० | २२/०५/२०२० | ५ |

**टिप :- एकच लॉटरी काढण्यात येणार असून शाळेच्या रिक्त जागेच्या संख्येइतकीच प्रतिक्षा यादी राहणार.**आहे

Scanned by CamScanner